☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 314 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 15 / 08 / 2025

# स्वातंत्र्य दिनानिमित्त नांदेड पोलीस दलातर्फे ''स्ट्रिट सेफ्टी निर्भया रॅली'' संपन्न..

**मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड यांचे संकल्पना व मार्गदर्शनाखाली दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त विदयार्थी, महिला व बालकांच्या सुरक्षा अनुषंगाने नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने **"स्ट्रिट सेफ्टी निर्भया "**रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रॅलीपुर्वी पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्रास्तवीक मांडून मान्यवरांचे पोलीस दलाचे वतीने स्वागत करण्यात आले. मा. पालकमंत्री यांचे हस्ते विदयार्थी, महिला व बालकांच्या सुरक्षेकरीता मा. मुख्यमंत्री यांचे 100 व 150 दिवसांचे कृती आराखडयामध्ये तयार करण्यात आलेल्या ऑनलाईन तक्रारी प्रणालीमध्ये अदयावतीकरन करून **"समाधान ऑनलाईन पोर्टल"** चे उदघाटन करण्यात आले असून यामध्ये विदयार्थी, बालक, महिला तसेच नागरिकांना त्यांच्या तक्रारीची स्थिती ही व्हॉटसअप मॅसेज व एस.एम.एस. व्दारे मिळणार आहे. सदरचे पोर्टल पोलीस अधीक्षक कार्यालय, 36 पोलीस स्टेशन व 10 उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालयांना सलग्न आहे. तसेच मा श्री शहाजी उमाप, पोलीस उप महानिरीक्षक यांनी नागरिकांच्या सोईसाठी व तक्रारीची माहिती घेण्यासाठी **"हेल्पलाईन खबर" 91 50 100 100** या क्रमांकाचे औपचारीक उद्घाटन केले आहे. मा.श्री पालकमंत्री व उपस्थीत मान्यवर व विदयार्थांना नांदेड पोलीस विदयार्थां करीता राबवित असलेले उपक्रम ज्यामध्ये मिशन निर्भया, मिशन समाधान, स्ट्रिट सेफ्टी मोहीम याबाबतची माहिती शॉर्टफिल्मव्दारे दाखविण्यात आलेली आहे. स्ट्रिट सेफ्टी पथकातील अधिकारी सपोनि श्री. भागवत नागरगोजे, पोउपनि दर्शने व चार्ली पेट्रोलिंग अंमलदार पोकॉ/सचिदानंद सोरडगे, नितीन वाघमारे, विवेकानंद सुरोड, पांडूरंग कैलासे, यांना पालकमंत्री यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले आहे.

सदर उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. अतुल सावे, पालकमंत्री नांदेड मा. श्री. शहाजी उमाप, पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड, परिक्षेत्र नांदेड, मा. श्री. राहुल कर्डीले, जिल्हाधिकारी व मा. श्री. आर.बी. जाधव, अध्यक्ष व प्रतिनिधी, नांदेड कोचिंग क्लासेस इत्यादी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये मा.श्री.पालकमंत्री यांनी पोलीस अधीक्षक श्री अबिनाश कुमार, हे विदयार्थी,बालक व विदयार्थासाठी नेहमीच नवनविन उपक्रम राबवित असतात. विदयार्थी, पालक व नागरीक यांनी देखील कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलीसांसोबत समन्वय ठेवून सहकार्याची भावना ठेवावी व कशोशिने शिक्षण घेवून जिल्हयाचे नावलौकिक करावे असे मत व्यक्त केले आहे.

तसेच इतर मान्यवरांनी देखील नांदेड पोलीस राबवित असलेल्या उपक्रमांची विशेष दखल घेवून प्रशंसा केली आहे. या उपक्रमाव्दारे विदयार्थी व शिकवणुक संस्थाच्या सुरक्षिततेची सुनिश्चिती करण्यात आली असून नांदेड मध्ये विदयार्थ्यांच्या शिक्षणाकरीता पोषक वातावरण असून भयमुक्त व निर्भीडपणे विदयार्थ्यांनी शिक्षण घ्यावे असे आवाहण आपल्या भाषणाव्दारे करण्यात आले.

तद्नंतर मा. पालकमंत्री महोदयांचे हस्ते स्ट्रिट सेफ्टी रॅलीला हिरवा झेंडा दाखवून सुरवात करण्यात आली. सुरवातीला पोलीसांच्या चार्ली पथकाची वाहने, सजविलेले थार वाहन, पारंपारिक ढोल पथक व मागे विदयार्थी असे होते. भर पावसात देखील शहरातील विविध क्लासेसच्या विदयार्थ्यांनी फेटे बांधून व तिरंगा ध्वज हातात घेवून उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला यामध्ये एन.सी.सी.कॅडेटस, शिक्षक व पालक यांनी देखील सहभाग नोंदविला.सदर रॅलीस जवळपास 3000 विदयार्थी,पालक व शिक्षकांची उपस्थिती होती. सदर रॅली कोनाळे क्लासेस पासून सुरू होवून स्टेडीयम रोडने व्ही.आय.पी. रोडवरील तिरंगा ध्वजाजवळ राष्ट्रगीताने संपन्न झाली.

सदर रॅलीसाठी मा. श्री अतुल सावे, पालकमंत्री नांदेड, मा. श्री बालाजी कल्याणकर, आमदार , नांदेड उत्तर, मा. श्री आनंदराव बोंढारकर आमदार, नांदेड दक्षिण, मा. श्री शहाजी उमाप, पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड, परिक्षेत्र नांदेड, मा. श्री राहुल कर्डीले, जिल्हाधिकारी नांदेड, मा.श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड, श्रीमती मेघना कावली, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नांदेड, मा. श्री. महेशकुमार डोईफोडे, आयुक्त म.न.पा.नांदेड, श्रीमती रेडडी मॅडम परिविक्षाधीन भा.प्र.से., मा. श्री आर.बी.जाधव, अध्यक्ष, नांदेड कोचिंग क्लासेस, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड, मा. श्री रामेश्वर वेंजने, उप विभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, श्रीमती अश्विनी जगताप, उप विभागीय पोलीस अधिकारी कंधार, श्री उदय खंडेराय, पो.नि.स्थागुशा, श्री वसंत सप्रे, पो.नि. सायबर, श्री रियाज शेख, वाचक,श्री पाटील स.पो.नि. पोउपनि/मारोती चव्हाण यांनी पार पाडले आणि कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राध्यापक श्री संतोष देवराये यांनी केले आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड